


# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३५९ वा | मंगळवार दि ०५ मे २०२६ | पृष्ठ ८ | किमंत ३ रुपये

# प्रादेशिक पक्षांचं वर्चस्व संपुष्टात, भाजपचा ऐतिहासिक विजय २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत कल कायम राहण्याचे अंदाज...

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व संपुष्टात आणि राष्ट्रीय परिघावर भक्कम झालेले द्विध्रुवीय राजकारण, पश्चिम बंगालमधील भाजपचा ऐतिहासिक विजय आणि अन्य चार राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निकालांचे असे एका वाक्यात वर्णन करता येईल. हेच कल २०२९ च्या लोकसभा निवडणुकांतही कमी अधिक फरकाने कायम राहतील, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. पश्चिम बंगालच्या रणात देशाच्या राजकारणाचा पोत बदलून टाकण्याचे सामर्थ्य आहे, हे ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भाजपसह संघपरिवाराने जाणीवपूर्वक रणनीती आखून तडीसही नेली, हिंदू मतांचे जबरदस्त ध्रुवीकरण मतपेटीत उमटेल याची बूथपातळीवरून भक्कम बांधबंदिस्ती केली, इतर राज्यांतील लाखो बंगाली मतदार मतदानासाठी येतीलच याची चोख व्यवस्था केली. निवडणुकांत विजयच मिळवायचा असतो हे धोरण व त्याला साजेशी रणनीती करण्यात भाजपचा हात धरणारा एकही पक्ष त्यांच्या आसपासही सध्या नाही. बंगालमध्ये संघटनात्मक परिश्रमांच्या जोडीला मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणी (एसआयआर) प्रक्रियेत लाखो लोकांची नावे मतपत्रिकांतून कापली गेली. तिथपासून निवडणुकीच्या तोंडावर अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा महापूर आला. या साऱ्यांचा एकत्रित परिणाम म्हणजे भाजपने पश्चिम बंगाल नामक एक भक्कम गड यावेळी सहजासहजी सर केला. अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत महत्वाच्या प्रदेशांत एका पक्षाचे एकछत्री साम्राज्य, हे स्वातंत्र्यानंतरची जवळपास तीन दशके दिसणारे दृश्य पुन्हा दिसत असून त्यात महत्वाचा फरक इतकाच की हा पक्ष काँग्रेस नव्हे तर भाजप आहे. मुर्शिदाबाद, मालदा यासारख्या भागांत भाजपची चमकदार कामगिरी हे देशातील मतपेढीचे राजकारण अस्ताकडे जाणारे मोठे पाऊल मानले पाहिजे. बंगालमध्ये सुमारे ३० टक्क्यांहून अधिक मुस्लिम लोकसंख्या अनेक मतदारसंघांमध्ये निर्णायक ठरते. पारंपरिकरित्या आधी काँग्रेस, मग डावे, नंतर तृणमूल काँग्रेस यांच्यासाठी हे मतदारसंघ सत्तेची गुरुकिल्ली मानले जात. मात्र, यावेळी या मतदारसंघांमध्येही भाजपने घेतलेली आघाडी व ममता बॅनर्जी यांच्या दशकभराच्या सत्तेला बसलेला मोठा धक्का हा केवळ निवडणूक रणनीतीचा परिणाम नसून, मतदारांच्या मानसिकतेतील परिवर्तनाचेही द्योतक मानावा लागेल. तमिळनाडूच्या राजकारणातील यंदाची उलथापालथ अभूतपूर्व आहे. अभिनेते विजय थलपथी यांच्या नव्या कोऱ्या तामिळगा वेत्री कळघम ची (टीव्हीके) सुप्त लाट द्रमुक, अण्णाद्रमुक या पक्षांच्या भल्याभल्या नेत्यांनाही जाणवली नाही. पदार्पणातच शंभरी गाठून राज्याची सत्ता नजरेच्या टप्प्यात आणण्याची कामगिरी करणारे एन. टी. रामाराव, अरविंद केजरीवाल (काही अंशी एम जी रामचंद्रन) यांच्या पंक्तीत विजय यांना स्थान मिळाले आहे. आसामची सूत्रे काँग्रेसने प्रियांका गांधी यांच्याकडे दिली ती किती कागदोपत्री होती व अतिअहंकारी गौरव गोगोईंवर राहुल गांधी यांचा विश्वास कसा अनाठायी होता हे आसाममधील हिमंता बिस्व सरमा यांच्या विजयाच्या हॅटट्रिकने सिद्ध झाले. थोडक्यात भाजप व काँग्रेस असा थेट सामना जेथे असतो तेथे काँग्रेसने ऐनवेळी हातपाय गाळते हे अनेक राज्यांप्रमाणे आसामातही दिसले. केरळच्या रुपाने काँग्रेसने आपल्या राज्यांच्या संख्येत केलेली वाढ आणि बंगाल, आसाम व पद्दुचेरीतील भाजप-



एनडीएचा विजय यातून राष्ट्रीय पातळीवरील सत्तासंतुलनातही अदृश्य पण लक्षणीय बदल होण्याची शक्यता आहे. लोकसभेत सध्या विरोधक मजबूत स्थितीत आहेत. पण दर संसद अधिवेशनात गोंधळ घालून रोजच्या रोज कामकाज बंद पाडायचे की महिला आरक्षण विधेपकाप्रमाणे एकजूट अभंग ठेवून, धारदार चर्चेने सरकारला जेरीस आणायचे याचा विचार विरोधकांना करावा लागणार आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर ती मुख्य जबाबदारी असेल. ममता बॅनर्जी यांच्यामुळे भाजपने बंगालमध्ये चंचुप्रवेश केला, या काँग्रेसच्या आरोपात तथ्य आहेच पण ममता यांनी तसे का केले याचा विचार काँग्रेसने कधी तरी करणे अपरिहार्य आहे. भारतीय परिदृश्यात बंगालचे वेगळे स्थान आहे. ब्रिटिशांनी रॉबर्ट क्लाइव्हच्या नेतृत्वाखाली २३ जून १७५७ रोजी प्लासीची निर्णायक लढाई जिंकली. त्याच विजयातून भारतात ब्रिटिश वसाहतवादी राजवटीचा पाया घातला गेला. पुढची दीडशे वर्षे ब्रिटिश राजवटीने भारतात मुक्काम ठोकला. स्वातंत्र्योत्तर काळात ४ मे २०२६ रोजी बंगालचे रण जिंकून अजिंक्य भाजपने आपल्या विरोधकांना दिलेला इशारा समझनेवालों को काफी है.

# ममता बॅनर्जींना डबल धक्का! सत्ता तर गेलीच, पण हक्काच्या मतदारसंघातून आमदारकीही हुकली...

**वृत्तसंस्था/ पश्चिम बंगाल**

पश्चिम बंगालच्या निकालात आज सर्वात मोठा राजकीय भूकंप झाला आहे. खुद्द मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आपल्या हक्काच्या भवानीपूर मतदारसंघात पराभवाचा धक्का बसला आहे. गेल्या १५ वर्षांपासून बंगालवर सत्ता गाजवणाऱ्या दीदींना मतदारांनी घरचा रस्ता दाखवला आहे. भाजपचे उमेदवार शुभेंदू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांचा १५,११४ मतांनी पराभव केला आहे. एकेकाळच्या आपल्याच विश्वासू सहकाऱ्याने दीदींचा बालेकिल्ला उद्ध्वस्त केला आहे. या पराभवामुळे तृणमूल काँग्रेसच्या गोटात मोठी शांतता पसरली आहे. दिवसभर या मतदारसंघामध्ये आघाडी पिछाडीचा खेळ सुरु होता. पण आता या मतदारसंघाचा संपूर्ण निकाल हाती आला आहे. त्यामुळे पश्चिम बंगालच्या राजकारणातील सर्वात




प्रतिष्ठेच्या भवानीपूर मतदारसंघात अखेर भाजपने बाजी मारली आहे. २० व्या आणि शेवटच्या फेरीची मतमोजणी पूर्ण झाली असून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव झाला आहे. एकेकाळचे ममतांचे अत्यंत विश्वासू सहकारी असलेल्या शुभेंदू अधिकारी यांनी सलग दुसऱ्यांदा त्यांना थेट लढतीत पराभूत करून आपले राजकीय वर्चस्व सिद्ध केले आहे. २०२१ मध्येही त्यांनी ममतांना पराभूत केलं होतं. या निकालामुळे केवळ भवानीपूरच नाही, तर संपूर्ण बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला मोठा हादरा बसला आहे. दरम्यान, भवानीपूर येथील मतदारसंघाच्या मतमोजणी केंद्रातून बाहेर पडल्यानंतर तृणमूलच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी एक खळबळजनक आरोप केला होता. त्या म्हणाल्या, मला मारहाण करण्यात आली आहे दरम्यान, बंगालमधील महाविजयानंतर पंतप्रधान मोदींनी दिल्लीतील पक्षाच्या कार्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित केले आहे, त्यानंतर आता भाजपने सोशल मीडियावर खेला शेष म्हणजेच खेळ संपला अशी पोस्ट केली आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी खेला होबे (खेळ सुरु झाला आहे) असे म्हटले होते. त्याला आज भाजपने उत्तर दिले आहे. दरम्यान भाजप बंगालमध्ये २०५ जागांवर आघाडीवर आहे.

# श्वानास ओळख गंधाची

## संपादकीय लेख

श्वान मंडळी वासावरून अनेक गोष्टी समजून घेतात. काही कुत्रे तर ठराविक वास घेण्यासाठी प्रशिक्षित असतात. श्वानांच्या नाकामध्ये एक कोटी गंधग्राहक पेशी असतात. याच्या तुलनेत मानवात ६० लाख पेशी असतात. श्वानाचे नाक वास घेण्यासाठी माणसापेक्षा दहा हजार पटीन अधिक तयार झालेले असते. कुत्र्यांच्या या गंधग्राहक क्षमतेवर एआयद्वारे संशोधन होत आहे. वास घेत असताना कुत्र्याच्या मेंदूच्या ठरावीक भागात होणारे कार्य पडताळून पाहण्यासाठी ङ्गएआय स्पेकल पॅटर्न ॲनालिसीसफ पद्धतीचा वापर केला गेला. मेंदूतील ॲमिग्डला, घ्राण कंद (ओलफॅक्टरी बल्ब) आणि अश्वमेध (हिप्पोकॅम्पस) यांवर ऑप्टिकल सेन्सरचा वापर करून कुत्रा भिन्न वासांमध्ये कसा फरक करतो हे समजून घेण्यात आले. यापैकी ॲमिग्डला भावनिक प्रतिसादासाठी कार्य करत असतो. घ्राण कंद आलेल्या वासाचे पृथक्करण करून ती विदा अश्वमीनामध्ये साठवून ठेवते. कम्प्युटरला जोडलेला उच्च रिझोल्युशनचा डिजिटल कॅमेरा आणि हिरवा लेझर किरण यांद्वारे हे संशोधन होते. हिरवा लेझर किरण डोळे बंद केलेल्या चार कुत्र्यांच्या मेंदूमध्ये टाकला गेला आणि या चौघांना अनुक्रमे दारू, मादक अमली पदार्थ, मेंथोल आणि लसूण असे चार वास देण्यात आले. त्याने कुत्र्यांच्या मेंदूत ठराविक प्रकारचे ङ्गठिपक्यांचे आराखडेफ उठले. ते कॅमेऱ्याने टिपता आले. हा प्रयोग दर पाच सेकंदांनी चार वेळा पुन्हा पुन्हा करण्यात आला एआयद्वारे ठिपके आराखडे तपासण्यात आले. त्या संशोधनाने हे लक्षात आले की, ॲमिग्डला वास ओळखण्यासाठी महत्त्वाचा आहे आणि कुत्रा वासाचा संबंध ठराविक भावनेशी लावतो. कुत्र्यांना प्रशिक्षण देताना सकारात्मक भावनांनी ठराविक वास देऊन केल्यास त्यांच्या स्मरणात हे गंध लक्षात राहतात. या संशोधनाची पुढची पायरी म्हणजे कुत्र्यांच्या गळ्यात ठराविक पट्टे बांधले जातात, ज्याच्यात एआयद्वारे आदेश पेरलेले असतात. कुत्र्याच्या भुंकण्यावरून तो नक्की काय सांगतो आहे, हे कळेल अशा प्रकारचे पट्टे देखील एआयच्या सहाय्याने आता बनवण्यात येत आहेत.








*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नरसापूर अत्याचार प्रकरणी एसआयटी नेमा; विरोधकांची गृहविभागावर आगपाखड

**मुंबई/वृत्तसंस्था**

नरसापूर येथे चार वर्षांच्या मूलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणावरून विरोधकांनी गृहविभागावर आगपाखड केली आहे. या प्रकरणात राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच आरोपी करायला हवे, अशी मागणी शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी केली तर या प्रकरणात पोलिसांना आरोपीने याआधी गुन्हे केल्याचे माहीत असूनही पोलिसांनी ही माहिती न्यायालयात न दिल्याने याची चौकशी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (एसआयटी) नेमून करावी, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

नरसापूर प्रकरणातील आरोपीने याआधी गुन्हे केले याची माहिती कालपासून उपलब्ध असताना कोर्टात ही माहिती पोलिसांनी दिली नाही? कोर्टाने झापल्यावर पोलिसांनी रिमांड प्रत बदलल. इतका हलगर्जीपणा पोलीस करत असतील तर त्या बालिकेला काय न्याय मिळणार? पीडित कुटुंबीय आणि जनतेवर लाठीचार्ज करणे इतकेच कर्तृत्व पोलिसांचे आहे काय, असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी केला. या प्रकरणात पुणे पोलिसांची भूमिका अतिशय असंवेदनशील आणि हलगर्जीपणाची राहिली आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवू शकत नसल्याने या प्रकरणचा तपास एसआयटीमार्फत करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच गृहमंत्रीपद असून त्यांच्या कार्यकाळात लहान मुलींवर अत्याचाराचे प्रमाण वाढले असल्याची टीका संजय राऊत यांनी केली. फडणवीस हे



२४ तास राजकारणात अडकल्याने त्यांचा गृह विभागावर वचक राहिलेला नाही. फडणवीसांनी मिसिंग लिंकच्या वाहतूककोंडीनंतर माफी मागितली, मात्र त्यांनी नरसापूर प्रकरणात माफी मागितली पाहिजे अशी मागणी राऊत यांनी केली. लाडक्या बहिणींना महिन्याला १५०० रुपये मिळत असतील, मात्र मोबदल्यात त्यांच्या मुलींवर जर अत्याचार होत असतील तिने तोंड बंद करून राहावे का, असा सवाल त्यांनी केला.

पुण्यातील ४ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तीची हत्या करण्यात आल्याची घटना संताप आणणारी व माणुसकीला काळीमा फासणारी आहे, अशा नराधमांना फाशीच दिली पाहिजे. राज्यात कायद्याचा धाकच राहिला नसल्याचे सांगण्यास ही घटना पुरेशी आहे. वास्तविक पाहता सरकारचा पोलिसांवर व पोलिसांचा गुन्हेगारांवर वचकच राहिलेला नाही, पोलीस गृहमंत्र्यानाही जुमानत नाहीत हे चित्र आहे, अशी टीका मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केली.

नसरापूरमध्ये त्या चिमुरडीसोबत जे घडले, ते ऐकून मन सुन्न झाले असून डोके रागाने भणभणतय. सुट्टीसाठी आजीकडे आलेल्या ३-४ वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केली जाते? ही कोणती विकृती आपण आपल्या समाजात आणि राज्यात पोसतोय? असा संतप्त सवाल मनसे नेते अमित ठाकरे यांनी समाजमाध्यमाद्वारे केला.

## शिवसेना-भाजपा युती २०२९ ला तुटणार? मंत्री शिरसाटांच्या 'त्या' वक्तव्यावर फडणवीसांचं मोठं भाष्य; म्हणाले, "मला वाटतं...

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपाने राजकारण तापलेलं असतानाच आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याची तयारी महायुतीमधील राजकीय पक्ष करत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे शिंदे सेना आणि भाजपाची युती २०२९ ला तुटणार का? याबाबत चर्चांना उधाण आलं आहे. या संदर्भाने आज सामना वृत्तपत्रातील संपादकीयमध्ये मोठा दावा करण्यात आला होता. यावर प्रतिक्रिया देताना शिवसेनेचे (शिंदे) मंत्री संजय शिरसाट यांनीही मोठं वक्तव्य केलं होतं.

'आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना (शिंदे) स्वबळावर निवडणूक लढवू शकतात', असं शिरसाट यांनी म्हटलं होतं. मंत्री शिरसाट यांच्या या वक्तव्याबाबत पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला. मात्र, यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी थेट उत्तर देणं टाळलं. 'शिवसेनेत बोलण्याचा अधिकार फक्त शिंदेंनाच आहे', असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.

"मला असं वाटतं की शिवसेनेत (शिंदे) बोलण्याचा अधिकार केवळ एकनाथ शिंदे यांनाच आहे. त्यामुळे जर एकनाथ शिंदे यांनी याबाबत काही वक्तव्य केलं तर मला त्याबाबत तुम्ही (पत्रकारांनी) प्रश्न विचारले पाहिजेत. मात्र, तरी याबाबत तुम्हाला विचारायचं असेल तर आमच्या प्रवक्त्यांना विचारलं पाहिजे", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. "भाजपा भविष्यातील निवडणुका स्वबळावर लढणार आहे. भाजपाची गाडी फुल झाली, चढायला जागा नाही. ही गाडी अजित पवारांचा पक्ष आणि शिंदेंच्या शिवसेनेला ठोकर मारून पुढे जाण्याच्या विचारात आहे. अजित पवारांचा पक्ष गिळण्याची तयारी झाली आहे आणि उद्या शिंदे यांचे आमदारही भाजपामध्ये जातील", असा उल्लेख सामनाच्या संपादकीय लेखात करण्यात आला आहे. सामना संपादकीयमध्ये करण्यात आलेल्या दाव्याबाबत पत्रकारांनी मंत्री संजय शिरसाट यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, "प्रत्येक राजकीय पक्ष आपली संघटना मजबूत करण्याच्या आणि निवडणुकांची तयारी करण्याचा प्रयत्न करत असतो. तसं करण्याचा त्यांना अधिकार आहे. मित्रपक्ष जर स्वतंत्रपणे निवडणूक लढवू इच्छित असतील तर त्यांना रोखणारी कोणतीही राजकीय व्यवस्था नाही", असं शिरसाट म्हणाले. "भाजपा २०२९ ला स्वबळावर निवडणूक लढवू शकतो का? तर लढवू शकतो. हीच गोष्ट शिवसेना (शिंदे) पक्षालाही लागू होते. मित्रपक्षांनी वेगवेगळी निवडणूक लढवू नये, यासाठी राजकारणात कोणताही करार किंवा बाँड नसतो. भाजपा आणि शिवसेना (शिंदे) वेगळे होऊन अगदी एका जागेसाठीसुद्धा स्वतंत्रपणे निवडणुका लढवू शकतील", असंही मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं.

## "मला डॉक्टर व्हायचं होतं, पण...", पंकजा मुंडेंनी सांगितला किस्सा; म्हणाल्या, मुंडे फार भाग्यवान..

**मुंबई/वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी परळीमधील एका कार्यक्रमात बोलताना त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नाबाबत भाष्य केलं आहे. पंकजा मुंडे या सध्या राजकारणात आहेत. मात्र, राजकारणात येण्याआधी त्यांना नेमकं कोणत्या क्षेत्रात करिअर करायचं होतं? याबाबत त्यांनी पहिल्यांदाच खुलासा केला आहे.

पंकजा मुंडे यांना डॉक्टर व्हायचं होतं, मात्र मार्क कमी पडले आणि त्यांचं डॉक्टर व्होण्याचं स्वप्न अपूर्ण राहिल्याची खंत पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे. या कार्यक्रमात धनंजय मुंडे देखील उपस्थित होते. त्यांच्याबाबत बोलताना धनंजय मुंडे फार भाग्यवान असल्याचंही पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे. तसेच पंकजा मुंडे यांनी त्यांच्या स्वत:च्या व्यवसायाबाबतही भाष्य केलं. त्यांच्या वक्तव्यानंतर कार्यक्रमात एकच हशा पिकल्याचं पाहायला मिळालं.

"मला डॉक्टर व्हायचं होतं, डॉक्टर होण्याची मला खूप हौस होती. पण मी डॉक्टर झाले नाही. कारण माझा तत्ववादी स्वभाव होता आणि मला मार्क कमी मिळाले म्हणून मी ॲडमिशन घेतलं नाही. मग आमच्या प्रीतम ताईंना (प्रीतम मुंडे) वकील व्हायचं होतं, पण त्या डॉक्टर झाल्या आणि येसू ताई वकील झाल्या. म्हणजे ज्याला जे व्हायचं नसतं ते व्हावं लागतं. मात्र, धनुभाऊ तुम्ही फार भाग्यवान आहात, तुम्हाला राजकारणात यायचं होतं तुम्ही राजकारणात आलात", असं म्हणत पंकजा मुंडे यांनी त्यांच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नाबाबत खंत व्यक्त केली.

त्या म्हणाल्या की, "माझा जो व्यवसाय आहे, त्याचा आणि माझा काहीही दुरान्वये संबंध नाही. मी मोठी डिस्टिलरी चालवते. अल्कोहल बनवते. तिथला कारभार कसा चालतो, किंवा तेथील ब्रँड कोणता? हे सुद्धा मला माहिती नाही. पण तरी मी ते उद्योग चालवते", असं म्हणताच उपस्थितामध्ये एकच हशा पिकल्याचं पाहायला मिळालं.

# तापलेल्या प्रकरणांवर एसआयटीची फुंकर, एसआयटींचा तपास सुरुच

**मुंबई, वृत्तसंस्था :**

पुणे जिल्हयाच्या भोर तालुक्यातील नसरापूर येथील अल्पवयीन बालिकेवर झालेल्या अत्याचार आणि खून प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्याची घोषणा राज्य सरकारने रविवारी केली. गेल्या दोन वर्षात राज्यातील विविध घटनांच्या एसआयटी तपासाची गती पाहता गंभीर आणि राजकीयदृष्टया तापलेल्या प्रकरणांवर राज्य सरकार एसआयटीची फुंकर मारत वेळ काढत असल्याचे दिसून येते.

राज्यात विविध गंभीर प्रकरणांच्या तपासासाठी वेळोवेळी विशेष तपास पथके (एसआयटी) स्थापन करण्यात आली आहेत. यातील काही महिलांवरील अत्याचाराशी सबंधित तर काही राजकीय वाद, हत्याप्रकरणाशी सबंधित एसआयटींचा समावेश आहे. नसरापूरप्रमाणेच सातारा येथील अल्ववयीन मुलीची हत्याप्रकरण, फलटनमधील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरण, नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात यांने महिलांचे केलेले शोषण, नाशिकमधील टीसीएस कंपनीतील धर्मांतर आणि महिलांचे शोषण अशा काही गाजलेल्या आणि समाजात संतापाचा उद्रेक झालेल्या



घटनांचा विविध एसआयटींच्या माध्यमातून तपास सुरु आहे.

नसरापूर येथील बालिका हत्याप्रकरणाच्या तपासासाठी पोलिसांनी आता विशेष तपास पथकाची घोषणा केली आहे. अशाचप्रकारे राज्यात गेल्या काही महिन्यात घडलेल्या महिला अत्याचार प्रकरणांच्या चौकशीसाठी विविध एसआयटींची स्थापन करण्यात आली आहेत. अशाच प्रकारे सातारा जिल्ह्यातील सासपडे येथे एका शालेय विद्यार्थिनीच्या हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी ऑक्टोबर २५ मध्ये एसआयटीची घोषणा करण्यात आली होती. याच दरम्यान सातारा जिल्ह्यातील फलटन येथे महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाने राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. या प्रकरणात सरकारशी सबंधित काही राजकीय नेतेमंडळींवर आरोप झाल्यानंतर सखोल तपासासाठी एसआयटीची घोषणा करण्यात आली. मात्र या दोन्ही प्रकरणात एसआयटीकडून केवळ तपास सुरु असल्याचे सांगितले जात आहे.

नाशिकमध्ये गेल्या काही महिन्यात एसआयटींचा सुळसुळाट झाला असून भोंदूबाबा अशोक खरात, टीसीएस महिला अत्याचार, त्र्यंबकेश्वर दर्शन काळाबाजार, धर्मांतर आणि म्हाडा घरांचा घोटाळा अशा विविध सहा प्रकरणांमध्ये एकाच वेळी सहा एसआयटी पथक काम करत आहेत. भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाची भारतीय पोलीस सेवेतील महिला अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली सुमारे दोन डझनहून अधिक पोलिस अधिकाऱ्यांची एसआयटी तपास करीत आहे. तर टीसीएस कंपनीचील महिला कर्मचाऱ्यांचे शोषण आणि धर्मांतर प्रकरणाची स्वतंत्र एसआयटी मार्फत चौकशी सुरू आहे.

राज्यात गाजलेल्या शालार्थ आयडी घोटाळा, वन जमीन हस्तांतरण प्रकरण,मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती घोटाळ्यांची विशेष तपास पथकाच्या माध्यमातून चौकशी सुरू आहेत. त्याचप्रमाणे मराठा क्रांतीच्या आरक्षण आंदोलनादरम्यान मनोज जरांगे-पाटील यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या गंभीर आरोपांमागील 'मास्टरमाइंड' कोण आहे आणि या आंदोलनाला राजकीय फूस किंवा आर्थिक पाठबळ होते का याचा शोध घेण्यासाठी सरकारने नेमलेल्या एसआयटीचा तपासही अजून संपलेला नाही. राज्यात गाजलेल्या बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीने काही आरोपांनी अटक केली असली तर अजूनही या प्रकरणातील काही आरोपी एसआयटीला सापडलेले नाहीत. परळीतील महादेव मुंडे हत्या प्रकरणाच्या तपासासाठीही सरकारने एसआयटी स्थापन केली आहे. विविध प्रकरणात गेल्या दोन दोन तीन वर्षात सरकारने अनेक प्रकरणांच्या तपासासाठी एसआयटी स्थापन केल्या असल्या तरी एकाही प्रकरणाचा तपास एसआयटीने पूर्ण केल्याचे आणि आरोपींना शासन झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे एसआयटी पथकांच्या कामगिरीबाबत सरकारने एकादी श्वेतपत्रिकाच काढावी अशी माहिती विरोधकांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती.

# सोलापूरचं 'मिर्झापूर' झालंय का? 6 हत्या; कोणाचा गळा चिरला तर कुणाला दगडाने ठेचलं

**सोलापूर/वृत्तसंस्था**

सोलापूर जिल्ह्याची ओळख आजवर पश्चिम महाराष्ट्रातील 'दुष्काळी जिल्हा' म्हणून राहिली आहे. मात्र, आता दुर्दैवाने सोलापूरची ही ओळख 'रक्तरंजित सोलापूर' होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. गेल्या अवघ्या ७२ तासांत सोलापूर जिल्ह्याच्या विविध भागात तब्बल ६ निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण जिल्हा हादरून गेला आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अवघ्या तीन दिवसांत सहा हत्या झाल्याने सोलापूर शहर आणि ग्रामीण पोलीस दलावर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे.

१ मे रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगाव (शिवाजी नगर) येथील रहिवासी संजय विठ्ठल शिंदे (वय ५४) यांची अज्ञात कारणावरून गळा चिरून हत्या करण्यात आली. अज्ञात आरोपीने त्यांच्या मानेवर शस्त्राने खोल वार केले होते. कामगार दिनाच्या दिवशीच घडलेल्या




या घटनेने उळे परिसरात प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

दुसरी घटना बार्शी तालुक्यातील वैराग शहरात घडली. शनिवारी २ मे रोजी वैरागच्या दत्तनगर परिसरात दिनेश उर्फ अप्पासाहेब दादासाहेब कापसे (वय ३१) या तरुणाचा डोक्यात दगड घालून अत्यंत क्रूरपणे खून करण्यात आला. भरवस्तीत झालेल्या या खुनामुळे बार्शी तालुक्यात तणावाचे वातावरण पसरले होते.

वैरागची घटना ताजी असतानाच, २ मे रोजी रात्री दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गावातून काळजाचा थरकाप उडवणारी बातमी आली. येथे एकाच कुटुंबातील तिघांची निर्घृण हत्या करण्यात आली. गायत्री सुधाकर मस्के (वय ४२), त्यांची मुलगी प्रिया मस्के (वय १८) आणि मुलगा शिवराज मस्के (वय १६) या तिघांचा बळी गेल्याने संपूर्ण जिल्ह्याची झोप उडाली आहे. जमिनीच्या वादातून हे हत्याकांड झाल्याची चर्चा आहे.

सोलापूर शहरातील गजबजलेला भाग असलेल्या सत्तर फूट रोड परिसरात रविवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास पुन्हा एकदा रक्ताने जमीन माखली. माधन नगर येथे सुरेश कृष्णा श्रीराम (वय ३५, रा. नीलम नगर) यांची ६ जणांनी मिळून डोक्यात दगड घालून आणि कोयत्याने वार करून हत्या केली. दिवसाढवळ्या झालेल्या या खुनामुळे शहरात भीतीचे सावट पसरले आहे.

## गाडी अडवून हल्ला, दगडाने ठेचून संपवलं

**सोलापूर/वृत्तसंस्था**

तरूणाच्या हत्येने सोलापूर हादरलं आहे. शहरातील 70 फूट रोडवर 5 जणांच्या टोळक्याने एका तरूणाचा भरदिवसा खून केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे. गेल्या काही काळापासून राज्यातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अनेक ठिकाणी खून-मारामारीच्या घटना समोर आल्या आहेत. असातच आता तरूणाच्या हत्येने सोलापूर हादरलं आहे. शहरातील 70 फूट रोडवर 5 जणांच्या टोळक्याने एका तरूणाचा भरदिवसा खून केला आहे. या घटनेचा अंगावर काटा आणणार व्हिडिओही समोर आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.



सोलापूरमध्ये वर्चस्ववादातून भर रस्त्यात तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. सुरेश श्रीराम असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. सुरेशला 5 आरोपींनी भर रस्त्यात गाडी आडवून कोयत्याने हल्ला केला. त्यानंतर त्याची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पूर्ववैमनस्यातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. आता पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन तपासाला सुरुवात केली आहे. सोलापूर शहरातील 70 फूट रोडवर सुरेश श्रीराम याची दुचाकी अडवत त्याच्यावर कोयत्याने हल्ला केला. पाच ते सहा जणांच्या हल्ल्यामुळे सुरेशला प्रतिकारही करता आला नाही. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे त्याचा अवघ्या काही सेकंदांमध्ये जीव गेला. वराह पालनावरून आरोपी आणि मयत सुरेशमध्ये पूर्वीपासून वाद होता अशी माहिती समोर आली आहे. तसेच मृत सुरेश श्रीरामवर एकूण 10 गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. सध्या 6 पैकी 5 आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणाच्या तपासाला सुरूवात केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील बोरामणी गावात ट्रिपल मर्डर झाला होता.

## बॉसला दारू पार्टीत बोलावून क्रूरपणे संपवलं

**मुंबई :** कामाचा ताण, टार्गेटचा त्रास आणि बॉसकडून झालेल्या कथित छळाने वैतागलेल्या कर्मचाऱ्याने हादरवणारं कृत्य केलं आहे. उत्तर प्रदेशातील कानपूरमधील दोन कर्मचाऱ्यांनी सेल्स मॅनेजरची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मोनू जायस्वाल (३०) असे हत्या झालेल्या सेल्स मॅनेजरचे नाव आहे. सेल्स मॅनेजरच्या हत्येने परिसरात खळबळ उडाली आहे.

मोनू जायस्वाल हे २६ एप्रिल रोजी सायंकाळी घरातून निघाले. त्यानंतर बेपत्ता झाले. एका दिवसाने त्यांचा मृतदेह उन्नावच्या गंगाघाट पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रस्त्यावर आढळला. पोलीस अधिकारी सत्यजीत गुप्ता यांनी सांगितलं की, 'मोनू हे मृत्यूच्या काही तास आधी त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी बापन पाल याच्यासोबत होते. याच बापन पालला पोलिसांनी ताब्यात घेतलं. बापन हा पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत होता. त्याचे कॉल डिटेल रेकॉर्ड, मोबाइल लोकेशन आणि सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती आल्यानंतर त्याने गुन्हा कबुल केला.

## सासऱ्याकडून सुनेची हत्या, ६ महिन्यांच्या बाळासमोर डोक्यात दगड घातला

**ठाणे/वृत्तसंस्था**

पुण्यामध्ये सासऱ्याने सुनेची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. कौटुंबिक वादातून ही घटना घडली. भिंतीवर डोकं आपटून आणि दगडाने मारहाण करत आरोपीने सुनेला जागीच संपवलं. त्यानंतर आरोपीने घराला कुलूप लावून पळ काढला. या घटनेमुळे पुणे हादरले. या प्रकरणा नांदेड सिटी पोलिस ठाण्यामध्ये आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सध्या आरोपीचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना शनिवारी सकाळी धायरीतील रायकर मळा परिसरात घडली. स्वाती तेजस चौधरी (वय ३१ वर्षे) असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. भानुदास भास्कर चौधरी (वय ५७ वर्षे) असं आरोपीचे नाव आहे. स्वातीचा नवरा तेजस शिवाजीनगर कोर्टात क्लर्क म्हणून काम करतात. शनिवारी सकाळी तेजस चौधरी नेहमीप्रमाणे कामावर गेले. घरामध्ये स्वाती तिचे सहा महिन्यांचे बाळ आणि सासरा हे तिघे होते.

स्वाती आणि तिचा सासरा भानुदास यांच्यामध्ये नेहमी कौटुंबीक कारणांवरून वाद होत होते. शनिवारी देखील दोघांमध्ये याच कारणावरून वाद झाला. त्यानंतर स्वाती बाथरुममध्ये कपडे धुण्यासाठी निघून गेली. यावेळी आरोपी भानुदास चौधरी त्याठिकाणी गेला. त्याने स्वातीचे डोकं भिंतीवर आपटले त्यानंतर तिच्या डोक्यात दगड घातला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या स्वातीचा जास्त रक्तस्राव होऊन जागीच मृत्यू झाला. सूनेची हत्या केल्यानंतर आरोपी घराला कुलूप लावून पळून गेला. तेजस यांच्या बहिणीने वहिणी स्वातीला फोन केला पण ती फोन उचलत नव्हती. त्यामुळे तिने तेजस यांना फोन करून सांगितले. तेजस यांनी शेजारी राहणाऱ्या एका महिलेला फोन करून घरामध्ये काय झाले पाहण्यास सांगितले. त्यांनी घराचा दरवाजा उघडला तेव्हा घरातील परिस्थिती पाहून त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. घरामध्ये स्वाती बाथरूममध्ये रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. तर त्यांचे बाळ घरामध्येच होते.

## पत्नी आणि मेव्हुणीनं गळा दाबून खून केला, साडूनं शेतात मृतदेह लपवला

**बीड/वृत्तसंस्था**

कौटुंबिक वादातून पत्नीने आपल्या बहिणीच्या आणि साडूच्या मदतीने पतीचा गळा दाबून हत्या केल्याची धक्कादायक घटना गेवराई तालुक्यातील पांढरवाडी फाटा येथे उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, आरोपींनी पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह आणि दुचाकी चक्क गोदावरी नदीत फेकून दिली होती. तब्बल ८ महिन्यांपूर्वी घडलेल्या या 'थंड डोक्याने' केलेल्या खुनाचा छडा लावण्यात गेवराई पोलिसांना यश आले आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथील रहिवासी उद्धव तुकाराम शिंदे (५०) हे ३ सप्टेंबर २०२५ रोजी पत्नी संगीतासह गेवराई तालुक्यातील पांढरवाडी येथे आपल्या मेव्हणीच्या घरी (सविता विष्णू वाजे) आले होते. पोलीस तपासात समोर आलेल्या



माहितीनुसार, उद्धव शिंदे हे नेहमी पत्नीला मारहाण करत असत. ६ सप्टेंबर रोजी पुन्हा त्यांच्यात मोठा वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्याने पत्नी संगीताने आपली बहीण सविता आणि साडू विष्णू वाजे यांच्या मदतीने उद्धव यांचा गळा दाबून खून केला.

खून केल्यानंतर आरोपींनी मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी अत्यंत नियोजनबद्ध पावले उचलली, विष्णू वाजे याने आपल्या दोन अल्पवयीन मुलांच्या मदतीने सुरुवातीला मृतदेह उसाच्या शेतात लपवला. दोन-तीन दिवसांनी मृतदेहाचा वास येऊ लागल्याने आरोपींनी प्रेत गोणीत भरून दुचाकीवरून शहागड येथील जुन्या पुलावरून गोदावरी नदीत फेकून दिले. त्यानंतर दोन दिवसांनी मृतकाची मोटारसायकलही त्याच पुलावरून नदीपात्रात फेकून दिली जेणेकरून कोणताच पुरावा उरणार नाही. मुख्य आरोपी संगीता शिंदे हिने संशय येऊ नये म्हणून पुणे येथील सिंहगड पोलीस ठाण्यात पती बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली होती.

गेल्या ८ महिन्यांपासून हे प्रकरण शांत होते. मात्र, मृतकाचा मुलगा शुभम शिंदे याला वडिलांच्या बाबतीत काहीतरी अघटीत घडल्याचा संशय होता. २ मे २०२६ रोजी शुभमने गेवराई पोलीस ठाणे गाठून आपली शंका बोलून दाखवली. पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. पांढरवाडी येथून विष्णू आणि सविता वाजे यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

मात्र, पोलिसांनी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. या प्रकरणी पोलिसांनी गोदावरी नदीपात्रातून मृतकाच्या दुचाकीचा सांगाडा जप्त केला आहे. मुख्य आरोपी संगीता शिंदे हिला नन्हे (पुणे) येथून ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात कलम १०३(१), २३८, ६६(२) भा.न्या.सं. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सपोनि दीपक लंके पुढील तपास करत आहेत. सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. किशोर पवार व त्यांच्या पथकाने केली आहे.

# हैदराबादला येता येता पेशावरला गेला आणि ठरला फायनलचा शिल्पकार; अर्धशतक आणि 4 विकेट्स

**इस्लामाबाद, वृत्तसंस्था :**

जॅक एडवईस दुखापतग्रस्त झाल्यानंतर सनरायझर्स हैदराबाद संघ बदली खेळाडूच्या शोधात होता. त्यांच्या रडारवर आरोन हार्डीचं नाव होतं. हार्डी लिलावात अनसोल्ड गेला होता. त्यामुळे हैदराबादला संधी होती. पण त्यांनी डेव्हिड पायनेला घेतलं. हार्डीला पाकिस्तान सुपर लीगमधल्या पेशावर झाल्मी संघाने करारबद्ध केलं. हैदराबादच्या वाटेवर असतानाच हार्डी पेशावरला गेला. त्याच हार्डीने फायनलमध्ये ४ विकेट्स आणि अर्धशतकासह झाल्मी संघाला जेतेपद पटकावून दिलं.

लाहोर इथल्या गड्डाफी स्टेडियमवर विक्रमी ३२,४६१ चाहत्यांच्या साक्षीने हार्डीने झाल्मी संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. पहिल्यांदाच समावेश झालेल्या हैदराबाद किंग्समेन संघाचा डाव आव्हानात्मक खेळपट्टीवर १२९ धावांतच आटोपला. सईम अयुबने ५४ धावांची एकाकी झुंज दिली. किंग्समेनच्या सहा फलंदाजांना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही. झाल्मी संघातर्फे आरोन हार्डीने २७ धावांत ४ विकेट्स घेतल्या. नाहिद राणाने २ विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली.

या लक्ष्याचा पाठलाग करताना झाल्मी संघाची अवस्थाही डळमळीत होती. भरवशाचा बाबर आझम शून्यावर बाद झाला. मोहम्मद हॅरिस ६ धावा करून तंबूत परतला. कुशल मेंडिस ९ धावांवर बाद झाला. बाबर आणि कुशल स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत अव्वल स्थानी आहेत. मायकेल ब्रेसवलही ४ धावा करून माघारी परतला आणि झाल्मी संघाची अवस्था ४०/४ अशी होती. पण तिथून आरोन हार्डी आणि अब्दुल समद यांनी पाचव्या विकेटसाठी ६० चेंडूत ८५ धावांची भागीदारी



करत विजयाचा पाया रचला. ४८ धावा करून समद बाद झाला. या खेळीत ३ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. हार्डीने एकखांबी नांगर टाकत ३९ चेंडूत ९ चौकारांसह नाबाद ५६ धावांची खेळी केली. अष्टपैलू कामगिरीसाठी हार्डीला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. किंग्समेन संघातर्फे मोहम्मद अलीने ३ विकेट्स पटकावल्या पण त्याला सक्षम साथ मिळू शकली नाही. अफगाणिस्तानच्या रहमनुल्ला गुरबाझने वैयक्तिक कारणास्तव माघार घेतल्यामुळे झाल्मी संघव्यवस्थापनाने हार्डीला संघात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. २७वर्षीय हार्डीने १५ वनडे आणि १६टी२० सामन्यात ऑस्ट्रेलियाचं प्रतिनिधित्व केलं आहे. बिग बॅश स्पर्धेत तो पर्थ स्क्रॉचर्स संघाकडून खेळतो. २०२५ हंगामात हार्डी पंजाब किंग्ज संघाचा भाग होता. मात्र त्याला एकदाही खेळण्याची संधी मिळाली नाही. पंजाबने त्याला रिटेन केलं नाही. २०२५ मध्ये कार्बिन बॉश तर यंदा ब्लेसिंग मुझाराबानीने पाकिस्तान सुपर लीगमधल्या संघाशी करारबद्ध असूनही आयपीएलमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे दोघांवरही बंदीची कारवाई झाली होती. हार्डीही पेशावर झाल्मीची साथ सोडून सनरायझर्स हैदराबादकडे येणार अशी चर्चा होती मात्र तसं झालं नाही. हार्डीने १० विकेट्स आणि १३३ धावा करत झाल्मी संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## मुंबईची अवस्था पाहून माजी खेळाडूने पंड्यावर केली बोचरी टीका

**मुंबई /वृत्तसंस्था**

हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्ससाठी सध्याची आयपीएल जणू एखाद्या वाईट स्वप्नासारखी ठरली आहे. चेन्नईतील चेपॉक स्टेडियममध्ये चेन्नई सुपर किंग्सकडून संघाला ८ गडी राखून दारुण पराभव पत्करावा लागला. मैदानावर या पराभवाची चर्चा शांततेत सुरू असताना, भारताचे माजी निवडकर्ता कृष्णमाचारी श्रीकांत यांच्या वक्तव्यांनी मैदानाबाहेर वादळ निर्माण केलं आहे.

श्रीकांत यांनी मुंबईचा कर्णधार हार्दिक पंड्यावर जोरदार हल्ला चढवला, त्याला 'प्लास्टिक कॅप्टन' म्हटलं आणि त्याच्या कर्णधारपदावर व फलंदाजीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. हार्दिक पंड्याच्या नेतृत्त्वाखाली मुंबईने आतापर्यंतचे ९ पैकी फक्त २ सामने जिंकले आहेत. यासह संघ आता गुणतालिकेत नवव्या स्थानी आहे. हार्दिकच्या नेतृत्त्वाचाही परिणाम संघाच्या कामगिरीवर सातत्याने पाहायला मिळत आहे. हार्दिक पंड्या यंदा बिलकुल लयीत दिसलेला नाही. त्याने चेन्नईविरूद्ध सामन्यात २३ चेंडूत फक्त १८ धावा केल्या आणि संघाची धावगती १२.५ षटकांत ४ बाद १०९ वरून थेट ७ बाद १५९ पर्यंत घसरली. शेवटच्या षटकात तो बाद झाला आणि संपूर्ण डावात केवळ दोनच चौकार मारू शकला. अखेरीस चेन्नई सुपर किंग्सने हा सामना ८ विकेट्सने जिंकला. हार्दिकच्या डावात तब्बल १० चेंडू निर्धाव (डॉट बॉल) गेले, ज्यामुळे माजी निवडकर्ता श्रीकांत आश्चर्यचकित झाले. आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना त्यांनी हार्दिकच्या खेळीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं, "आकडे बघा, २३ चेंडूत १८ धावा. हे काय आहे? तो 'प्लास्टिक कर्णधार' आहे," अशी टीका त्यांनी केली. "ती भागीदारी बघा, त्यामागचा हेतू काय होता? हार्दिक नेमकं काय करण्याचा प्रयत्न करत होता? मधल्या षटकांतील डॉट बॉल्स पाहिले, तर स्पष्ट दिसतं की कोणतंही योग्य नियोजन किंवा खेळाची जाणीव नव्हती. त्या टप्प्यात धावगती खूपच खाली आली," असे श्रीकांत म्हणाले.

## दिमाखात पदार्पण आणि काही तासात जखमी होऊन स्पर्धेबाहेर; चेन्नईमागची दुखापतींची मालिका थांबेना

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

शनिवारी चेन्नई सुपर किंग्सने महाराष्ट्राकडून खेळणाऱ्या रामकृष्ण घोष या युवा वेगवान गोलंदाजाला पदार्पणाची संधी दिली. अफलातून झेल आणि उत्तम स्पेल टाकत रामकृष्णनने चाहत्यांची मनं जिंकली. मात्र याच लढतीत तो दुखापतग्रस्त झाला. दुखापत गंभीर असल्याने तो उर्वरित हंगामात खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे.



रामकृष्णच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाल्याचं चेन्नई सुपर किंग्सच्या वैद्यकीय चमूने स्पष्ट केलं. शनिवारी चेन्नई संघाने रामकृष्णने पदार्पण केलं. सामन्याच्या आठव्या चेंडूवर विल जॅक्सने मारलेला फटका अचूक टिपत रामकृष्णने आयपीएल प्रवासाची दिमाखात सुरुवात केली. गोलंदाजीची संधी मिळाल्यानंतर रामकृष्णने भारतीय टी२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवला बाद केलं. रामकृष्णच्या उसळत्या चेंडूवर सूर्यकुमारने हवेत उडी घेत मोठा फटका मारायचा प्रयत्न क्षेत्ररक्षकाच्या हातात जाऊन विसावला.

२०२५ मेगा ऑक्शनमध्ये चेन्नईने रामकृष्णला ३० लाख रुपये मोजून ताफ्यात घेतलं. पण त्याला गेल्या वर्षी एकाही सामन्यात संधी मिळाली नाही. चेन्नईने त्याला रिटेन केलं. शनिवारी त्याला पदार्पणाची संधी मिळाली मात्र दुर्देवाने याच लढतीत तो तो दुखापतग्रस्त झाला. चेन्नई संघाला लागलेलं दुखापतींचं ग्रहण पाठ सोडत नाहीये. पायाला झालेल्या दुखापतीमुळे माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी अद्याप एकही सामना खेळू शकलेला नाही. वेगवान गोलंदाज नॅथन एलिस हंगाम सुरू होण्याआधीच दुखापतग्रस्त झाला. भन्नाट फॉर्मात असलेला आयुष म्हात्रेलाही दुखापत झाली. डावखुरा वेगवान गोलंदाज खलील अहमदच्या मांडीच्या स्नायूंना दुखापत झाल्यामुळे तोही स्पर्धेबाहेर गेला आहे. रामकृष्ण घोष हा मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगा आहे, ज्याला महाराष्ट्राच्या वरिष्ठ संघात स्थान मिळवण्यासाठी प्रचंड मेहनत करावी लागली. पण त्याने कधीच हार मानली नाही. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून आयोजित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत तो चमकला. या स्पर्धेत त्याला ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळण्याची संधी मिळाली. ऋतुराज गायकवाड हा पुणेरी बाप्पा संघाचा कर्णधार आहे. आता तो पुन्हा एकदा ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळत आहे. तो सर्वात चर्चेत तेव्हा आला, जेव्हा त्याने विजय हजारे ट्रॉफीत हिमाचल प्रदेश संघाविरूद्ध खेळताना एकाच डावात ४२ डावात ७ गडी बाद केले होते.

## वॉशिंग्टनचा विजयी षटकार अन् अखेरच्या षटकात गुजरातचा रोमांचक विजय

**अहमदाबाद/वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्सने अखेरच्या षटकात टेबल टॉपर पंजाब किंग्सवर ४ विकेट्सने रोमांचक विजय मिळवला. या विजयासह आता गुजरात टायटन्स संघाचेही १२ गुण झाले आहेत. पण १३ गुणांसह पंजाब किंग्सचा संघ अजूनही गुणतालिकेत पहिल्या स्थानी आहे. पंजाबला प्लेऑफ गाठण्यासाठी फक्त दोन सामने जिंकण्याची गरज आहे. पण प्लेऑफच्या उंबरठ्यावर असताना पंजाबने गेले दोन सामने गमावले आहेत. पंजाबने प्रथम फलंदाजी करताना १६४ धावांचं आव्हान दिलं होतं, गुजरातने हे आव्हान १९.४ षटकांत गाठलं.



गुजरात टायटन्सला अखेरच्या २ षटकांत म्हणजेच १२ चेंडूत विजयासाठी १७ धावांची गरज होती. अर्शदीप १९वं षटक टाकण्यासाठी आला. अर्शदीपने पहिल्या चार चेंडूवर ५ धावा दिल्या आणि पाचव्या चेंडूवर जेसन होल्डरला बाद करत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली. यासह आता अखेरच्या षटकात गुजरातला विजयासाठी ११ धावांची गरज होती. मार्कस स्टॉयनिसला अखेरचं षटक टाकण्याची जबाबदारी देण्यात आली. त्याने पहिला चेंडू वाईड टाकला, यानंतर पहिल्या लीगल चेंडूवर यॉर्कर चुकल्याने अरशद खानने चौकार लगावला. यानंतर अरशदने मोठा फटका खेळला, पण सूर्यांश झेल टिपू शकला नाही आणि तितक्यात दोन धावा घेतल्या. चौथा चेंडू डॉट बॉल राहिला. यासह ३ चेंडूत ४ धावांची गरज होती, चौथा चेंडू यॉर्कर टाकला आणि चेंडू टोलवून अरशद एक धाव घेण्यासाठी धावला आणि स्टॉयनिस त्याला धावबाद करण्यात अपयशी ठरला. दुसऱ्या चेंडूवर वॉशिंग्टन सुंदरने षटकार लगावत संघाला शानदार विजय मिळवून दिला.

पंजाबने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरूवात चांगली झाली. पण शुबमन गिल लवकर बाद झाला. गिल ५ धावांवर बाद झाल्यानंतर साई सुदर्शनने ४१ चेंडूत ५ चौकार व एका षटकारासह ५७ धावांची खेळी केली. तर जोस बटलर २६ धावा करत बाद झाला. निशांत सिंधूने १५ धावांचं योगदान दिलं. वॉशिंग्टन सुंदरने अखेरच्या षटकापर्यंत सावध खेळी करत कायम होता आणि संघाला गरज असताना त्याने मार्कस स्टॉयनिसच्या अखेरच्या षटकात षटकार खेचत संघाला विजय मिळवून देत माघारी परतला.

पंजाबच्या गोलंदाजांनी देखील सामन्यात सावध गोलंदाजी केली. विजयकुमार वैशाकने २ विकेट्स तर अर्शदीप सिंग, मार्को यान्सन व मार्कस स्टॉयनिस यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

गुजरात टायटन्सने सामन्याची नाणेफेक जिंकत पंजाबला फलंदाजीसाठी पाचारण केलं. मोहम्मद सिराजने गोलंदाजीची दणक्यात सुरूवात पहिल्याच षटकात प्रियांश आर्य आणि कुपर कॉनोलीला बाद करत पंजाबला मोठा धक्का दिला. यानंतर प्रभसिमरन सिंग १५ धावा तर कर्णधार श्रेयस अय्यर १९ धावा करत बाद झाले. तर नेहाल वधेरा शून्यावर बाद झाला. ४७ धावांवर ५ विकेट्स अशी अवस्था असताना सूर्यांश शेडगे फलंदाजीला आला आणि त्याने संघाला संकटातून बाहेर काढलं.

सूर्यांशने २९ चेंडूत ३ चौकार व ५ षटकारांसह ५७ धावा केल्या. तर मार्कस स्टॉयनिसने ३० धावा आणि मार्को यान्सने २० धावा केल्या. यासह संघाने २० षटकांत ९ बाद १६३ धावा केल्या. गुजरातकडून जेसन होल्डरने ४ षटकांत २४ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. तर कगिसो रबाडा व मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर रशीद खानने एक विकेट घेतली.

# घटस्फोटानंतर पहिल्यांदाच समांथा रुथ प्रभू आणि नागा चैतन्य एकाच ठिकाणी पोहोचले

२०२१ मध्ये समांथा रुथ प्रभू आणि नागा चैतन्य यांचा घटस्फोट झाला. आता दोघेही आपापल्या वैयक्तिक आयुष्यात पुढे गेले आहेत. समांथाने दिग्दर्शक राज निदिमोरू याच्याशी, तर नागा चैतन्यने अभिनेत्री शोभिता धुलिपाला हिच्याशी लग्न केलं. ते आपापल्या संसारात सुखी आहेत. नुकतेच हे दोघेही एकाच लग्न समारंभाला उपस्थित होते. 'एशियन सिनेमा'चे निर्माति सुनील नारंग यांची मुलगी सिमरन नारंग हिच्या लग्नाचे रिसेप्शन शनिवारी हैदराबादमध्ये पार पडले. या सोहळ्याला चिरंजीवी आणि नागार्जुन यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार उपस्थित होते. याच कार्यक्रमात समांथा आणि नागा चैतन्य हे देखील आपापल्या जोडीदारांसह पोहोचले.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये सामंथा जांभळ्या रंगाच्या सुंदर साडीत आली होती. राजचा हात धरून तिथे येताना तिच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद दिसत होता. एका व्हिडीओमध्ये ती गर्दीत आपल्या पतीचा सुरक्षा रक्षकांना धक्का लागू नये म्हणून त्याची काळजी घेतानाही दिसली. दुसऱ्या एका व्हिडीओमध्ये नागा चैतन्य आणि शोभिता हे नागार्जुन आणि अमला यांच्याबरोबर रिसेप्शनला आले. शोभिताने सुंदर साडी नेसली होती, तर नागा चैतन्य निळ्या रंगाच्या सूटमध्ये आला होता. आत जाण्यापूर्वी त्यांनी पापाराझींना पोझही दिली.



२०२१ मध्ये समांथा रुथ प्रभू आणि नागा चैतन्य यांचा घटस्फोट झाला. आता दोघेही आपापल्या वैयक्तिक आयुष्यात पुढे गेले आहेत. समांथाने दिग्दर्शक राज निदिमोरू याच्याशी, तर नागा चैतन्यने अभिनेत्री शोभिता धुलिपाला हिच्याशी लग्न केलं. ते आपापल्या संसारात सुखी आहेत. नुकतेच हे दोघेही एकाच लग्न समारंभाला उपस्थित होते. 'एशियन सिनेमा'चे निर्माते सुनील नारंग यांची मुलगी सिमरन नारंग हिच्या लग्नाचे रिसेप्शन शनिवारी हैदराबादमध्ये पार पडले. या सोहळ्याला चिरंजीवी आणि नागार्जुन यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार उपस्थित होते. याच कार्यक्रमात समांथा आणि नागा चैतन्य हे देखील आपापल्या जोडीदारांसह पोहोचले.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये सामंथा जांभळ्या रंगाच्या सुंदर साडीत आली होती. राजचा हात धरून तिथे येताना तिच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद दिसत होता. एका व्हिडीओमध्ये ती गर्दीत आपल्या पतीचा सुरक्षा रक्षकांना धक्का लागू नये म्हणून त्याची काळजी घेतानाही दिसली. दुसऱ्या एका व्हिडीओमध्ये नागा चैतन्य आणि शोभिता हे नागार्जुन आणि अमला यांच्याबरोबर रिसेप्शनला आले. शोभिताने सुंदर साडी नेसली होती, तर नागा चैतन्य निळ्या रंगाच्या सूटमध्ये आला होता. आत जाण्यापूर्वी त्यांनी पापाराझींना पोझही दिली.

२०१० मधील 'ये माया चेसावे' या गाजलेल्या चित्रपटात एकत्र काम केल्यानंतर सामंथा आणि चैतन्य अनेक वर्षे रिलेशनशिपमध्ये होते. ऑक्टोबर २०१७ मध्ये गोव्यात त्यांनी हिंदू आणि ख्रिश्चन अशा दोन्ही पद्धतींनी लग्न केलं. मात्र, २०२१ मध्ये त्यांनी घटस्फोट घेत असल्याची घोषणा केली.

२०२२ मध्ये नागा चैतन्य आणि शोभिता एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा होत्या, परंतु त्यांनी कधीही उघडपणे याची कबुली दिली नाही. अखेर डिसेंबर २०२४ मध्ये हैदराबादमधील अण्णापूर्णा स्टुडिओ येथे त्यांचं लग्न पार पडलं. तर, २०२३ मध्ये समांथाने राज निदिमोरू याच्याबरोबरचे फोटो सोशल मीडियावर शेअर करण्यास सुरुवात केल्यापासून त्यांच्या नात्याबद्दल चर्चा सुरू झाली होती. डिसेंबर २०२५ मध्ये या दोघांनी कोईम्बतूरमध्ये लग्न केलं. नागा चैतन्यच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तो शेवटचा 'थंडेल' चित्रपटात दिसला होता आणि आता त्याचा 'वृषकर्मा' हा सोशिओ-फँटसी चित्रपट येत आहे. तर शोभिताने यावर्षी प्राईम व्हिडीओवरील 'चीकटीलो' (Cheekatilo) या चित्रपटात काम केलं होतं. समांथाने २०२४ मध्ये वरुण धवनबरोबर 'सिटाडेल: हनी बनी' या वेब सीरिजमध्ये दिसली होती. लवकरच ती 'माँ इंटी बंगाराम' आणि 'रक्त ब्रह्मांड: द ब्लडी किंगडम'मध्ये दिसणार आहे. तर राज निदिमोरूने डीके सोबत 'सिटाडेल: हनी बनी'चे दिग्दर्शन केले होते.

## अभिनेता ऋग्वेद फडकेने गर्लफ्रेंड विभासोबत बांधली लग्नगाठ



मराठी मनोरंजन विश्वातील अनेक कलाकारांनी यंदाच्या वर्षी लग्नगाठ बांधत आयुष्यातील नव्या प्रवासाची सुरुवात केली. मालिकाविश्वातील असाच एक लोकप्रिय अभिनेता नुकताच लग्नबंधनात अडकला आहे. त्याच्या विवाहसोहळ्यातील फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या अभिनेत्याचं नाव आहे ऋग्वेद फडके.

ऋग्वेदच्या पत्नीचं नाव आहे विभा. या जोडप्याचा साखरपुडा गेल्यावर्षी एप्रिल महिन्यात पार पडला होता. आता वर्षभराने हे दोघंही लग्नबंधनात अडकले आहेत. यांच्या लग्नाचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. गेली अनेक वर्षे हे दोघंही एकमेकांना डेट करत होते. ऋग्वेदच्या पत्नीने काही वर्षांपूर्वी इन्स्टाग्रामवर एक छानशी पोस्ट लिहिली होती. "१७ सप्टेंबर २०२० पासून आपण एकत्र पाहिलेली कित्येक स्वप्नं आणि या काही वर्षात ती पूर्ण होण्याचा प्रवास... Rather एकत्र हट्टाने आणि जिद्दीने पूर्ण करण्याचा प्रवास...अशी अजून खूप स्वप्नं एकत्र पाहायची आहेत." यावरून हे दोघंही अनेक वर्षांपासून एकत्र असल्याचं स्पष्ट होतं.

ऋग्वेद आणि विभा यांचा लग्नसोहळा पारंपरिक पद्धतीने पार पडला. अभिनेत्याने लग्नात पेशवाई लूक केला होता. तर, त्याच्या पत्नीने निळ्या रंगाची सुंदर नऊवारी साडी नेसल्याचं पाहायला मिळालं. या दोघांच्या लग्नाला अनेक मराठी कलाकार देखील उपस्थित होते. ऋग्वेद फडकेच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं, तर 'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'थोडं तुझं आणि थोडं माझं' या लोकप्रिय मालिकेत त्याने महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. या मालिकेत त्याच्या व्यक्तिरेखेचं नाव विनोद असं होतं. तो 'पारू' मालिकेत सुद्धा झळकला होता. या दोन्ही मालिकांनी प्रेक्षकांचा निरोप घेतला आहे. याशिवाय ऋग्वेदने दिग्दर्शित केलेल्या 'मुशाफिरी' या नाटकाला सुद्धा प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. या नाटकात अभिनेता पु. ल. देशपांडेंची व्यक्तिरेखा साकारत आहे. याशिवाय ऋग्वेदने काही दिवसांपूर्वी लोणावळ्यात होमस्टे सुद्धा सुरू केला आहे. मळवली येथे उभारलेल्या त्याच्या व्हिलाचं नाव 'पारिजात' आहे. लग्नबंधनात अडकल्यावर मनोरंजन विश्वातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## 'राजा शिवाजी'च्या कमाईत तिसऱ्या दिवशी वाढ! रितेश देशमुखच्या चित्रपटाने कमावले 'इतके' कोटी

रितेश देशमुखची मुख्य भूमिका असलेला आणि बहुप्रतिक्षित ऐतिहासिक चित्रपट 'राजा शिवाजी' १ मे रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. रितेश देशमुखचा बहुप्रतिक्षित ऐतिहासिक चित्रपट 'राजा शिवाजी' सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाला समीक्षकांकडून संमिश्र प्रतिक्रिया मिळाल्या आहेत. या चित्रपटाने तिसऱ्या दिवशी म्हणजेच रविवारी बॉक्स ऑफिसवर आपली पकड मजबूत ठेवली आहे.



'सॅकनिल्क' च्या ताज्या आकडेवारीनुसार, राजा शिवाजी या चित्रपटाने १२.४० कोटी रुपयांची ओपनिंग केली होती. दुसऱ्या दिवशी चित्रपटाच्या कमाईत थोडी घसरण झाली होती. सिनेमाने शनिवारी ११.५० कोटी कमावले होते. त्या तुलनेत रविवारच्या कमाईत वाढ झाली. 'राजा शिवाजी' चित्रपटाने रविवारी तब्बल १२ कोटी रुपयांची कमाई केली. या चित्रपटाचे तीन दिवसांचे कलेक्शन ४१.९० कोटी रुपये झाले आहे.

हा चित्रपट हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांत प्रदर्शित झाला आहे. रविवारी हिंदी भाषेतील शोमधून राजा शिवाजी सिनेमाने ३.५२ कोटींचा गल्ला जमवला. तर उर्वरित कमाई मराठी भाषेतून केली. राजा शिवाजी चित्रपटाबरोबर जुनैद खान आणि साई पल्लवी यांचा 'एक दिन' हा चित्रपट देखील प्रदर्शित झाला होता. मात्र, या चित्रपटाकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे 'राजा शिवाजी'च्या कमाईवर कोणताही परिणाम झाला नाही. उलट 'एक दिन' चित्रपट दुसऱ्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर कोसळला असून त्याने १ कोटी रुपयांपेक्षाही कमी कमाई केली आहे.

'राजा शिवाजी' या चित्रपटात रितेश देशमुखसह अभिषेक बच्चन, जिनिलीया देशमुख, संजय दत्त, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी आणि अमोल गुप्ते यांसारख्या दिग्गज कलाकारांच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचे एक मुख्य आकर्षण म्हणजे सलमान खानचा खास कॅमिओ आहे. सलमानची भूमिकाही प्रेक्षकांना फार आवडली असून चित्रपटगृहात प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे, रितेश आणि जिनिलीया यांची मुलं राहिल व रियान यांनीही राजा शिवाजी सिनेमातून अभिनयात पदार्पण केलं आहे.

राज्यभरातून तसेच महाराष्ट्राबाहेरूनही प्रेक्षक मोठ्या संख्येने चित्रपटगृहांकडे वळताना दिसत आहेत. कुटुंबांसह चित्रपट पाहण्यासाठी गर्दी होत असून, 'राजा शिवाजी' हा मराठी चित्रपटसृष्टीतील वर्षातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या चित्रपटांपैकी एक ठरत आहे.

## ६७ वर्षीय मुकेश खन्ना लग्न करणार? स्पष्टच म्हणाले..

मुकेश खन्ना हे विविध कारणांमुळे सतत चर्चेत असतात. त्यांच्या वक्तव्यांची कायमच चर्चा होताना दिसते. मुकेश खन्ना यांनी अनेक बॉलीवूड सिनेमांमध्ये काम केले आहे.

याबरोबरच, त्यांनी काही मालिकांमध्येदेखील काम केले आहे. विशेष म्हणजे, बॉलीवूड सिनेमांमधून त्यांना जितकी लोकप्रियता मिळाली नाही, तितकी लोकप्रियता त्यांना टेलिव्हिजनवरून मिळाली. त्यांनी साकारलेल्या भूमिका मोठ्या प्रमाणात गाजल्या. शक्तिमान, भीष्म पितामह या त्यांच्या



भूमिकांबद्दल आजही बोलले जाते. मुकेश खन्ना ६७ वर्षांचे आहेत. ते आजही अविवाहित आहेत. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी प्रेम, लग्न, जोडीदार याबद्दल वक्तव्य केले आहे. नुकतीच मुकेश खन्ना यांनी फिल्मी चर्चाला मुलाखत दिली. ते म्हणाले, "मला एकदा रवी चोपडा म्हणालेले की ज्याचे अनेक अफेअर असतात तोच पुरुष असतो, पण मी त्या गोष्टीशी सहमत नाही. त्या ग्रुपमध्ये सगळ्यांचे अफेअर होते, माझे नाही. मला वाटतं पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी १० गर्लफ्रेंड असाव्यात असे काही नाही. पुढे ते म्हणाले, "लोक म्हणतात की स्त्री ही पतीव्रता असली पाहिजे. पण, आजपर्यंत असे कोणी म्हटले आहे का की पुरुषांनीसुद्धा एकनिष्ठ असायला हवे. माझे हेच म्हणणे आहे; जर तुम्ही विवाहित असाल तर तुम्ही वचनबद्ध आहात, पण लोक यावर विश्वास ठेवत नाहीत. ते म्हणतात की मी माझ्या पत्नीवर प्रेम करतो.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी नामांकित इंग्रजी माध्यम निवासी शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

जनसंचलन/बुलढाणा

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांच्या अंतर्गत येणाऱ्या ,व जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र २०२६-२७ मध्ये शहरातील नामांकित इंग्रजी माध्यम निवासी शाळांमध्ये इयत्ता १ लीमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज मागविण्यात आले आहेत. प्रवेश अर्ज विनामूल्य प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला कार्यालय तसेच नजिकच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये उपलब्ध आहेत. पालकांनी कोणत्याही भुलथापांना बळी न पडता किंवा कोणाच्याही माध्यमातून अर्ज न घेता संबंधित कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून अर्ज प्राप्त करून सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १० मे २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे.

# बुलढाणा तालुका भाजपची संघटनात्मक बैठक उत्साहात संपन्न...



जनसंचलन/बुलढाणा

भारतीय जनता पार्टी बुलढाणा तालुका ग्रामीण मंडळाची नियमित मासिक संघटनात्मक बैठक आज बुलढाणा येथील भाजपा जिल्हा कार्यालय शिवालय येथे उत्साहात पार पडली. या बैठकीत आगामी काळातील संघटनात्मक वाटचालीबाबत सखोल चर्चा करण्यात आली. विशेषतः समाजातील सर्व घटकांशी संपर्क व संवाद वाढविण्यावर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच गावोगावी भारतीय जनता पार्टीच्या शाखा स्थापन करण्याचा एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. देशात व राज्यात भाजपा व मित्रपक्षांचे लोककल्याणकारी सरकार कार्यरत असल्यामुळे जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून अधिक जोमाने काम करावे, असे आवाहन तालुका अध्यक्ष सतीश भाकरे पाटील यांनी आपल्या मनोगतातून केले. याच दरम्यान पश्चिम बंगाल, आसाम, केरळ व पांडिचेरी येथील विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होत असताना कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. विविध राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या यशाबद्दल अभिनंदनाचा ठराव एकमताने पारित करण्यात आला. भाजपा आपल्या संघटनात्मक बळावर आणि कार्यकर्त्यांच्या ताकदीवर ऐतिहासिक कामगिरी करत असून, आगामी काळात बुलढाणा तालुक्यातही अशीच यशस्वी कामगिरी करण्याचा दृढसंकल्प कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. या बैठकीस तालुका अध्यक्ष सतिश भाकरे पाटील, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष अॅड. मोहन पवार, व्ही.जे.एन.टी. सेल जिल्हाध्यक्ष योगेश राजपूत, एस आय आर बुलढाणा विधानसभा प्रमुख मंदार बाहेकर, तालुका प्रभारी अॅड. दशरथसिंग राजपूत, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष प्रीतीताई खंडारे, कामगार मोर्चा तालुकाध्यक्ष राजेंद्र पवार, महिला मोर्चा उपाध्यक्ष मनिषा पैठणे, तालुका उपाध्यक्ष सुरेश जाधव, गणेश जेऊघाले, कुलदीप पवार, तालुका सरचिटणीस सतीश देहडराय, प्रवीण गाडेकर, तालुका सचिव सुधाकर वानेरे, मोहन निमरोट, समाधान जाधव, कोषाध्यक्ष शरद एकडे, राम पुरभे, सुनील उबाळे, प्रकाश शेळके, दिनकर मुळे, भरत टेकाळे, रवींद्र जाधव, माजी सरपंच बाबुराव गायकवाड, युवा मोर्चा उपाध्यक्ष सागर पाटील, रामू पैठणे तसेच युवा मोर्चा सचिव घनश्याम बिबे आदी उपस्थित होते.

# भोन येथील ऐतिहासिक स्तूपावर बुद्ध महावंदना सोहळा संपन्न

जनसंचलन/ संग्रामपूर

जिल्ह्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालणाऱ्या संग्रामपूर तालुक्यातील भोन येथे बुद्ध जयंतीचे औचित्य साधून भव्य बुद्ध महावंदनाफकार्यक्रम उत्साहात पार पडला. जागतिक स्तरावर ओळख निर्माण झालेल्या या बुद्ध स्तूप स्थळावर भारतीय स्तूप व लेणी संवर्धन समितीच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या पाच मान्यवरांना जीवन गौरव पुरस्कार २०२६ देऊन गौरविण्यात आले. विविध क्षेत्रांतील रत्नांचा सन्मान दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समितीच्या वतीने समाजासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची निवड करण्यात आली होती. यामध्ये खालील मान्यवरांचा समावेश होता: भीमराव वाघमारे: (माजी परीक्षा नियंत्रक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल. सुदाम सोनुले: सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीतील प्रदीर्घ योगदानाबद्दल. अनिल बहादुरे: (माजी मुख्य अभियंता, जलसिंचन विभाग, अमरावती) प्रशासकीय सेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल. डॉ. संतोष वाकोडे: संशोधन क्षेत्रात केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल. विजयमाला वानखडे: (अध्यक्षा, भिमाई महिला बचत गट) उद्योग क्षेत्रात महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याबद्दल. मान्यवरांचे मनोगत पुरस्काराला उत्तर देताना अनिल बहादुरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, शासकीय सेवेत असताना जलसिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून भोन सारख्या ऐतिहासिक स्थळासाठी सेवा करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य आहे. समाजोपयोगी उपक्रमांसाठी मी सदैव कटिबद्ध राहीन.यांनी सामाजिक परिवर्तनावर भाष्य करताना सांगितले की, इतिहासातील घडामोडींचा अभ्यास करूनच आपण भविष्यातील आव्हानांना सामोरे जाऊ शकतो. युवकांनी शिक्षण आणि संशोधनाच्या संधी ओळखून प्रगती साधणे काळाची गरज आहे.ड्ढ सुदाम सोनुले यांनी देखील समितीने त्यांच्या कार्याची दखल घेतल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सांस्कृतिक आणि संघटनात्मक उपस्थिती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ मेश्राम होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव प्रा. प्रफुल खंडारे यांनी केले, तर सूत्रसंचालन कोषाध्यक्ष जी. एन. ब्राम्हणे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने पार पाडले. तर आभार प्रदर्शनाची जबाबदारी राजाभाऊ कोकाटे यांनी पार पाडली. संपूर्ण सोहळ्याच्या नियोजनात उपाध्यक्ष तथा मुख्य समन्वयक राजदत्त अलोने यांची भूमिका महत्त्वाची ठरली. कार्यक्रमाची सांगता अमोल पहुरकर आणि त्यांच्या संगीत संचाने सादर केलेल्या बुद्ध-भीम गीतांनी झाली. त्यांनी या ऐतिहासिक स्थळाप्रती आपली श्रद्धा व्यक्त करत निःशुल्क सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्याला परिसरातील बौद्ध अनुयायी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भोन स्तूप परिसर शेतीमालक श्रीकृष्ण इंगळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भोन गावकरी तसेच परिसरातील नागरिकांचे सहकार्य लाभले. भारतीय स्तूप व लेणी संवर्धन समितीचे सदस्य सुरेश वानखडे, विनोद वानखडे, अनिल भगत, प्रवीणजी इंगळे, माणिकराव वानखडे, अनिलजी लबडे, अनिलजी इंगळे, भीमरावजी परघरमोर, संतोष तायडे, राजाभाऊ कोकाटे, महादेवराव शेगोकार,सोहन धुरंधर, सुभाषराव शिरसाट, सुनीलजी धुंदळे, सुरेशजी बसवंत, राजेशजी उमाळे, महेंद्र बोर्डे, धाड, भीमराव मोकळे, पी. जी. तायडे, जगदीशजी हातेकर, प्राचार्य मुकुंद इंगळे, रणीत सर मुख्याध्यापक, प्राचार्य डॉ. शत्रूघ्न जाधव, अशोक वानखेडे यांनी विशेष मेहनत घेतली.

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्काराने आशा सिरसाट सन्मानित...

जनसंचलन/मेहकर



महिला आणि बालकांच्या तसेच एकल महिलांच्या क्षेत्रात केलेले काम तसेच सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेत महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून दिला जाणारा प्रतिष्ठेचा पुण्यश्लोक अहिलाबाई होळकर जिल्हास्तरीय पुरस्कार जिल्ह्याचे पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांच्या हस्ते आशा सिरसाट यांना १ मे महाराष्ट्र दिनानिमित शासकीय कार्यक्रमा मध्ये मा.डॉ.प्रविण देवरे जिल्हाधिकारी ,मा.निलेश तांबे जिल्हा पोलीस अधिक्षक ,मा. श्री.अमोल दिघुळे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये वितरीत करण्यात आला. कोरोना नंतर एकल झालेल्या महिलांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळून देणे, एकल बालकांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेचा लाभ मिळवून देणे, तसेच त्यांच्या उपजीविका शाश्वत राहण्यासाठी एकल महिलांना शिलाई-पिको फॉल मशीन हे वाटप, एकल महिलांना सामाजिक दृष्ट्या सन्मान मिळवून देण्यासाठी त्यांच्यासाठी हळदी कुंकू आणि तिळगुळ वाटप सारख्या कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांना समाजामध्ये प्रतिष्ठा मिळवून देणे इत्यादी कामे मिशन वात्सल्य समिती व अशा विविध समितीवर अशासकीय सदस्य म्हणून तसेच स्वयंसेवी संस्था च्या माध्यमातून त्यांनी केले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्कार बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शिवसाई यूनिवर्सल जुनिअर कॉलेज कोलवड , बुलडाणा ची १२वी च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम!

**जनसंचलन बुलढाणा**

शिवसाई यूनिवर्सल जुनिअर कॉलेज कोलवड , बुलडाणा ची १२वी च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम विज्ञान शाखा निकाल - १०० % फेब्रुवारी/ मार्च २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने घेतलेल्या परीक्षा मध्ये शिवसाई यूनिवर्सल ज्युनिअर कॉलेज कोलवड, बुलडाणा येथील ५५ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. यापैकी एकूण ८५ टक्क्याच्या वर गुण मिळविणारे एकूण २४ विद्यार्थी असून, २६ विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत (७५-८४%), ५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. याप्रमाणे महाविद्यालयाने आपली उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातून कु. ऋतुजा विनोद राऊत हिने ९२% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर कु. वंशिका गजेश जयस्वाल हिने ९१.१७% गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक मृणाल संतोष शिनकर हीने ८९.६७% गुण प्राप्त करून पटकवला आहे. कु.ऋतुजा पोफळे ८९.५०%, श्रेयस डुकरे ८९.५०%,



अलोक देशमुख ८९.५०%, धनंजय शिंदे ८९.००%, भावना शर्मा ८९.००%, कु. स्नेहा मोरे ८८.८३%, हर्षल जाधव ८८.१७%, सुहानी दांडगे ८८.१७%,दक्ष चव्हाण ८८.००%, दिशा काळवाघे ८७.१७%, सर्वेश कोलते ८७.००%,दीपाली राऊत ८७.००%, गायत्री मोरे ८६.५०%, रितेश घोती ८६.५०%, शंतनू वाघ ८६.३३%, श्रावण चव्हाण ८६.००%,सुमित बोचरे ८५.८३%,स्नेहल मिसाळ ८५.८३% संचिता कोळेकर ८५.१७%,आदित्य जाधव ८५.००%,सोमनाथ जाधव ८५.००%गुण प्राप्त करून विशेष प्रावीण्य मिळवले आहे. शिवसाई युनिवर्सल ने , व परीक्षेत देखील आतापर्यंत आपला निकालाचा दबदबा कायम ठेवला आहे. आतापर्यंत एकूण १४ विद्यार्थी ,४१ विद्यार्थी व साठी प्रवेशित झाले आहेत. तर च्या माध्यमातून १ विद्यार्थी , ५ विद्यार्थी व ५ विद्यार्थी साठी प्रवेशित झाले आहेत. तर - परीक्षेच्या माध्यमातून ७०० च्या वर विद्यार्थी इंजिनियरिंग, अग्रिकल्चर , नर्सिंग , फार्मसी क्षेत्रात प्रवेशित झालेले आहेत. विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. सुनील दाभाडकर, प्रा.प्रमोद मोहरकर, प्रा. सविता वानखेडे, प्रा.स्वप्नील काकडे, प्रा. मनोहर उजेड, प्रा. दीपक रंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शक करणाऱ्या सर्व विषय शिक्षक तथा प्राध्यापकांचे संस्था अध्यक्ष श्री. डी एस लहाने सर यांनी अभिनंदन केले.

# जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक एमआरआय सेंटरचे लोकार्पण

## गोरगरिबांना मिळणार मोठा दिलासा

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य सेवेत एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे अत्याधुनिक एमआरआय () सेंटरचे लोकार्पण सोहळा पालकमंत्री ना. मकरंदजी आबा पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. या सुविधेमुळे जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना आता महागड्या तपासण्यांसाठी शहराबाहेर जाण्याची गरज उरणार नाही. केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) ना. प्रतापरावजी जाधव आणि जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंदजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच जिल्ह्यातील सर्व आमदारांच्या विशेष प्रयत्नांतून ही एमआरआय मशीन उपलब्ध झाली आहे. विशेषतः बुलढाण्याचे आमदार संजयभाऊ गायकवाड यांनी या सेंटरसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री मकरंद पाटील म्हणाले की, ङ्गया अत्याधुनिक सेंटरमुळे सर्वसामान्य रुग्णांना स्थानिक पातळीवरच आधुनिक वैद्यकीय सेवा मिळणार आहे. वेळेत आणि स्वस्त दरात तपासणी होणार असल्याने रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल. आमदार संजय गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, एमआरआय सेंटरमुळे रुग्णांचे अचूक निदान होऊन उपचारांची गती वाढेल. लवकरच जिल्ह्यात अत्याधुनिक क्रिटिकल कॅथलॅब सेंटर देखील सुरू करण्यात येणार आहे. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे विशेष आभार मानले. या सोहळ्याला आमदार संजय गायकवाड, मनोज कायंदे, नगराध्यक्षा सौ. पूजाताई गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, स्त्री रुग्णालय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. घोगंटे, ओमसिंग राजपूत यांच्यासह अनेक पदाधिकारी, डॉक्टर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# किन्ही सवड गावातील वीस वर्षे बंद शेत रस्ते मोकळे; शेतकऱ्यांना दिलासा...

**जनसंचलन/बुलढाणा**

चिखली विधानसभा मतदारसंघातील किन्ही सवडद गावातील चार शेत रस्ते मागील वीस वर्षांपासून बंद असल्यामुळे येथील शेतकऱ्यांना अत्यंत गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागत होते. स्वतः च्या शेतापर्यंत पोहोचण्यासाठी कित्येक किलोमीटरचा वळसा घ्यावा लागत होता, ट्रॅक्टर व शेती अवजारे शेतापर्यंत नेता येत नव्हती, पेरणी व काढणीच्या हंगामात यंत्रे वेळेत पोहोचत नसल्याने मोठे नुकसान सहन करावे लागत होते, शेतमाल बाजारात वेळेत न पोहोचल्याने तो शेतातच खराब होत होता, तसेच जादा मजुरीचा भुर्दंडही शेतकऱ्यांना सोसावा लागत होता. वीस वर्षे वेगवेगळ्या यंत्रणांकडे तक्रारी करूनही या शेतकऱ्यांची समस्या सुटली नव्हती. अखेर किन्ही सवडच्या शेतकऱ्यांनी आमदार श्वेता महाले पाटील यांच्याकडे आपली व्यथा मांडली. आमदार महाले पाटील यांनी तातडीने दखल घेत चिखली तहसील कार्यालयाशी समन्वय साधला. त्यांच्या निर्देशानुसार नायब तहसीलदार श्री. मुरलीधर गायकवाड यांनी प्रत्यक्ष गावात भेट देऊन चारही शेत रस्ते मोकळे केले. वीस वर्षांत जे शक्य झाले नव्हते, ते आमदारांच्या हस्तक्षेपाने अल्पावधीत पूर्ण झाले. रस्ते मोकळे झाल्यानंतर गावातील शेतकऱ्यांनी आमदार श्वेता महाले पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानले. आम्ही वर्षानुवर्षे दाद मागत होतो, पण न्याय मिळत नव्हता. आमदार ताईंनी आमची समस्या समजून घेतली आणि त्वरित कारवाई केली,असे शेतकऱ्यांनी सांगितले. चिखली मतदारसंघातील शेतकरी व गोरगरीब जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आमदार श्वेता महाले पाटील सातत्याने कार्यरत असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

पाहिजेत
We are Hiring
खंडेलवाल ज्वेलर्स (अकोला) प्रा.लि.
बुलढाणामध्ये
ज्वेलरी शोरुमसाठी तरुण, उत्साही उमेदवार पाहीजेत.
1) शॉप मॅनेजर- 1 (M/F)
कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक व ज्वेलरी कामाची माहीती असलेल्या अनुभवी व्यक्तींना प्राधान्य
2) सेल्स एग्जीक्यूटिव - 5 (M/F)
बारावी शिक्षण आवश्यक, स्मार्ट व हसतमुख, कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक.
3) कॅशियर - 2 (M)
पदवीधर आणि तत्पर, जबाबदारीने कॅश काउंटर हाताळण्याचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य
आजच संपर्क करा..!
सर्व पदांसाठी सरकारी नियम (PF/ESIC) अनुसारआकर्षक पगार, इन्सेंटीव्हज व ईतर अलाउंस
आपली संपूर्ण माहिती व फोटोसह आपले अर्ज ई-मेल करा
hrkjapl@gmail.com
अधिक माहितीसाठी संपर्क: 9545454762 / 9545450822